नियमीत फौ. ख.क्र.०८/२०१७
सरकार विरुध्द आजिनाथ वगैरे
निशाणी क्र.९१

## अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र (०३) यांची जबानी.

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,
माझे नांवः– सुधाकर दिनकर खेडकर,
वय सुमारेः– ५६ वर्षे, व्यवसायः– शेती
निवासस्थानः– मुंगूसवाडे ता. पाथर्डी जि. अहमदनगर

## सर तपासणी

## अभियोग पक्षाकरिता श्रीमती ए. बी. कुलकर्णी, सहाय्यक सरकारी अभियोक्ता.

फिर्यादी ही माझी चुलती असल्याने मी तिला ओळखतो. आरोपी हे माझे भावकीतील असल्याने त्यांना देखिल मी ओळखतो. घटना कधी, कोठे व काय घडली होती हे मला माहित नाही. असे काही घडले नाही की, दि. २५.१०.२०१६ रोजी रात्री ९.०० वाजताच्या सुमारास मी गावचे कमानीजवळ असतांना त्यांचे घरासमोर रोडवर शिवीगाळीचा आवाज आल्याने मी तेथे गेलो असता आरोपी फिर्यादी व साक्षीदार यांना शिवीगाळ करत होते व मी त्यांना समजावून सांगत असताना आरोपींनी फिर्यादीचे केसाला धरुन खाली पाडले तसेच साक्षीदार सुर्यभान याला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली, तसेच आरोपींनी फिर्यादी व साक्षीदारांना आमच्या नादी लागले तर जिवे मारुन टाकून अशी धमकी दिली. पोलिसांनी माझा जबाब नोंदविला होता.

(साक्षीदार पुर्वीच्या जवाबाप्रमाणे साक्ष देत नसल्यामुळे सरकारी वकीलांनी साक्षीदारास फितूर घोषित करुन उत्तर सूचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. ... सबब ती देण्यात आली.)

## उलट तपासणी – सहाय्यक सरकारी अभियोक्ता.

०२. हे म्हणणे खरे नाही की, दि. २५.१०.२०१६ रोजी रात्री ९.०० वाजताच्या सुमारास मी गावचे कमानीजवळ असतांना त्यांचे घरासमोर रोडवर शिवीगाळीचा आवाज आल्याने मी तेथे गेलो असता आरोपी फिर्यादी व साक्षीदार यांना शिवीगाळ करत होते व मी

त्यांना समजावून सांगत असताना आरोपींनी फिर्यादीचे केसाला धरुन खाली पाडले तसेच साक्षीदार सुर्यभान याला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली, तसेच आरोपींनी फिर्यादी व साक्षीदारांना आमच्या नादी लागले तर जिवे मारुन टाकून अशी धमकी दिली. तो माझ्या जबाबात कसा आला हे मी सांगू शकत नाही. म्हणणे खरे नाही की, माझी आरोपी भावकीतील असल्याने त्यांना वाचविण्यासाठी मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपासणी**

**आरोपीकरिता श्री. आर. एन. खेडकर, वकील**

... नाकारला.

... फेर तपास ... काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत.

दिनांकः २०.०९.२०२५.

RAVIKIRAN VITTHAL SAPATE
Digitally signed by RAVIKIRAN VITTHAL SAPATE
Date: 2025.09.20 17:05:31 +0530

(**रविकिरण सपाटे**)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
पाथर्डी जि. अहमदनगर.